
# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

## झलकारी बाई (1830–1858)

***ठिकाण:** झाशी, उत्तर प्रदेश*



जेव्हा आपण झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंबद्दल बोलतो, तेव्हा आणखी एक नाव समोर येते - जी तिच्यासारखीच शूर होती आणि जिची कथा तितकीच प्रेरणादायी आहे. ती होती - **झलकारीबाई**.

तिचा जन्म झाशीजवळील दलित कोळी कुटुंबात झाला. लहानपणीसुद्धा ती सामान्य मुलींसारखी नव्हती - शेतात काम करण्याबरोबरच ती तलवारबाजी, घोडेस्वारी आणि नेमबाजी शिकली. असे म्हणतात की, तिने एकदा वाघाशी एकहाती सामना केला होता.

जेव्हा राणी लक्ष्मीबाईंनी **'दुर्गा दल'** नावाने स्त्रियांची फौज तयार केली, झलकारीबाई त्यात सामील झाल्या. तिचे धैर्य आणि नेतृत्व पाहून राणी तिला आपला विश्वासू मानू लागली.

1857 मध्ये झाशीला इंग्रजांनी वेढले होते. राणीला गडाबाहेर नेणे आवश्यक होते जेणेकरून ती उर्वरित सैन्यात सामील होऊ शकेल.

मग झलकारीबाईंनी अनोखी योजना आखली. ती हुबेहुब राणीसारखी दिसत होती. तिने राणीचे कपडे परिधान केले, दागिने घातले आणि सैन्यासमोर जाऊन स्वत:ची राणी अशी ओळख करून दिली आणि इंग्रजांचे लक्ष विचलित केले.

इंग्रजांनी विचार केला - **'आम्ही राणीला पकडले!'** दरम्यान, खरी राणी सुखरूप बचावली.

इंग्रजांना सत्य समजल्यावर त्यांना धक्काच बसला. झलकारीबाईला एकतर फाशी देण्यात आली किंवा ती पळून गेली आणि नंतर दीर्घायुष्य जगली.


**शिकवण:** झलकारीबाई आपल्याला शिकवतात की शौर्य जातीवर किंवा लिंगावर अवलंबून नसते. तिने आपला जीव पणाला लावून इतिहास बदलला. जेव्हा तुम्हाला भीती वाटते किंवा "मी एकटा काय करू शकतो/शकते?" तेव्हा झलकारीबाईंची शिकवण आठवा.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### ऊदादेवी पासी — दलित कन्या, शूर शहीद

***ठिकाण:** अवध, उत्तर प्रदेश*



ते वर्ष होते 1857. उत्तर भारतात संताप शिगेला पोहोचला होता. इंग्रजांच्या अन्याय व अत्याचाराला कंटाळून सर्वत्र बंडखोरी होत होती. या क्रांतीत एक नाव असं होतं, जी ना राजघराण्यातील होती ना श्रीमंत घराण्यातली होती - तर ती गरीब-दलित-शेतकरी कुटुंबातील होती. तिचे नाव होते - ऊदादेवी पासी.

उदादेवी या अवध (उत्तर प्रदेश) येथील रहिवासी होत्या. इंग्रजांनी अवधचे नवाब वाजिद अली शाह यांना हटवून लखनौवर कब्जा केला तेव्हा त्यांची पत्नी बेगम हजरत महल यांनी नेतृत्व स्वीकारले. उदादेवी बेगमच्या महिला सैन्याचा एक भाग बनल्या. देशाच्या स्वातंत्र्याच्या या चळवळीत त्याही सामील झाल्या. त्या फक्त एक सैनिक नव्हत्या तर - **त्या स्वतः एक नेता आणि एक प्रचंड शूर योद्धा होत्या.**

जेव्हा त्यांचे पती मक्का पासी इंग्रजांशी लढताना शहीद झाले तेव्हा उदादेवी यांनी शपथ घेतली -**"आता मी या परकीयांचा पाठलाग करीन आमच्या अवधमधून."**

लखनौ काबीज करण्यासाठी इंग्रज सैन्य पुढे सरसावले तेव्हा उदादेवीने एक योजना आखली. बंदुका घेऊन ती एका मोठ्या पिंपळाच्या झाडावर चढली. इंग्रज सैनिक जवळ येताच झाडावर बसलेल्या उदादेवीने त्यांच्यावर गोळ्या झाडत. काही वेळातच त्या शूर वीराने **सुमारे आठ ते दहा ब्रिटिश सैनिकांना ठार केले.**

ब्रिटिश अधिकाऱ्यांना आश्चर्य वाटले की आपल्या सैनिकांना मारणारा हा भारतीय सैनिक कोण आहे? तेव्हा त्यांना समजले की कोणीतरी त्यांच्या माणसांना झाडावरून गोळ्या घालत आहे. इंग्रज अधिकाऱ्याने या माणसाला अटक करण्याचे आदेश दिले. जेव्हा सैनिक झाडाजवळ जाऊ लागले तेव्हा उदादेवीने स्वतःवर गोळी झाडून घेतली जेणेकरून इंग्रजांकडून पकडले जाऊ नये. जेव्हा इंग्रजांना समजले की त्यांच्या पुरुषांना मारणारा भारतीय सैनिक एक स्त्री आहे, तेव्हा त्यांना खरोखरच आश्चर्य वाटले, कारण **त्यांनी त्यांच्या आयुष्यात असा योद्धा पाहिला नव्हता.**

**शिकवण:** उदादेवी पासीची कथा आपल्याला शिकवते की पराक्रम जात किंवा लिंगावर अवलंबून नसते. स्त्रिया फक्त घराची काळजी घेण्यासाठी नसतात. गरज पडल्यास त्या बंदूकदेखील उचलू शकतात. देशासाठी मरण्याची तळमळ प्रत्येकाच्या हृदयात असू शकते. उदादेवींची प्रेरणा घेऊन आपण आपल्या हक्क-अधिकारांसाठी आवाज उठवायला पाहिजे.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### मातंगिनी हाज़रा – गोळ्यांसमोर तिरंगा धरून उभी असलेली आजी

***ठिकाण:*** *मिदनापुर, पश्चिम बंगाल*




ही कथा आहे एका वृद्ध महिलेची. जी ना सैनिक होती ना नेता... पण तिच्यात होती- **स्वातंत्र्याची आवड**. त्यांचे नाव होते- **मातंगिनी हाजरा**.

मातंगिनी यांचा जन्म 1870 मध्ये बंगालमधील एका छोट्या गावात झाला. गरिबी आणि संघर्ष हे लहानपणापासूनचे त्यांचे सोबती होते. लहान वयात लग्न, त्या नंतर लगेचच पतीचे निधन. पण या दु:खांनी त्या तुटल्या नाही, उलट कणखर बनल्या.

गांधीजींनी इंग्रजांविरुद्ध मिठाचा सत्याग्रह सुरू केला. **वयाच्या 60 व्या वर्षी मातंगिनी हाजरा यांनीही चळवळीत उडी घेतली.** त्यांनी गावोगाव जाऊन लोकांना स्वातंत्र्यलढ्याशी जोडायला सुरुवात केली. हे केल्याने इंग्रजांनी त्यांना तुरुंगात टाकले. पण यामुळे त्या घाबरल्या नाहीत. ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढण्यासाठी लोकांना संघटित करत राहिल्या.

**1942 मध्ये भारत छोडो आंदोलनाला** सुरुवात झाली. मातंगिनी आता 72 वर्षांच्या झाल्या होत्या, पण धाडसाने त्या अजूनही तरुण होत्या. एके दिवशी त्यांनी गावातील 6000 लोकांसह तिरंगा घेऊन मिदनापूरमधील पोलीस चौकीच्या दिशेने कूच केली. तेथील युनियन जॅक काढून तिरंगा फडकवण्याचा त्यांचा उद्देश होता.

ब्रिटीश सैनिक घाबरले - आणि गोळीबार करू लागले. सर्वजण मागे हटले, पण मातंगिनी थांबल्या नाही. **त्यांना तीन गोळ्या लागल्या.** पण त्या पडेपर्यंत तिरंगा त्यांच्या हातात फडकत राहिला.

त्याच्या शेवटच्या श्वासातही एकच शब्द होता - ‘वंदे मातरम’.

**शिकवण:** मातंगिनी हाजरा आपल्याला शिकवतात, **देशभक्ती वयावर अवलंबून नसते.** जर हृदयात साहस असेल आणि आपला हेतू योग्य असेल तर **एक म्हातारी स्त्रीसुद्धा साम्राज्याची मुळे हलवू शकते.** आपण सर्व आज स्वातंत्र्यात आहोत ते अशा हजारो लोकांच्या बलिदानामुळे, आणि हे आपण कधीही विसरू नये.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### दुर्गाबाई देशमुख: तरुण वय, मोठे स्वप्न

***ठिकाण:** राजमुंद्री, आंध्र प्रदेश*



आंध्र प्रदेशातील राजमुंद्री नावाच्या शहरात १९०९ मध्ये एका सुंदर मुलीचा जन्म झाला. तिचे नाव होते **दुर्गाबाई देशमुख.** ती श्रीमंत कुटुंबातून आली नव्हती - तिचे वडील नरसिंह राव आणि आई कृष्णा वेंकटरत्नम्मा हे एका सामान्य कुटुंबातील होते. मात्र, दुर्गाबाईंची स्वप्ने मोठी होती.

ज्या वयात मुले खेळणी खेळतात; अशा **10 वर्षांच्या असताना दुर्गाबाईंनी** मात्र काहीतरी वेगळंच ठरवलं होतं! त्यांनी काकीनाडा शहरात महिलांसाठी चळवळ सुरू केली, **हिंदी शाळा** सुरू केली. तिने आईसह **500 हून अधिक महिलांना हिंदी शिकवले-** जेणेकरून त्या देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात सामील होऊ शकतील.

एक दिवस, **महात्मा गांधी आणि कस्तुरबा गांधी** त्यांच्या शाळेत आल्यावर एवढ्या लहान मुलीचे धाडस आणि मेहनत पाहून ते म्हणाले- *"ही खरी देशभक्त आहे!"* त्या दिवसापासून दुर्गाबाईंनी **खादी परिधान करायला सुरूवात केली** आणि इंग्रजांनी बांधलेल्या **इंग्रजी शाळा** यावर बहिष्कार टाकला.

दुसरं धाडस ऐका - त्या **आठ वर्षांच्या** असताना त्यांचा बालविवाह झाला, पण जसजशा त्या मोठ्या झाल्या त्यांनी या लग्नाला विरोध केला; पतीला सोडले आणि **अभ्यास पूर्ण करण्याचा निर्णय घेतला**. त्यांनी **BA, MA आणि वकिली**चे शिक्षण घेतले आणि नंतर मद्रास (सध्याचे चेन्नई) येथे वकिली केली.

पण वकील बनणे हे त्यांचे स्वप्न नव्हते - त्यांचे स्वप्न होते **देशाची सेवा करणे.** त्यांनी **मिठाचा सत्याग्रह** आणि **भारत छोडो आंदोलना**सारख्या आंदोलनात भाग घेतला; **अनेक वेळा तुरुंगवास**देखील **भोगला**.

स्वातंत्र्यानंतर दुर्गाबाईंनी **'आंध्र महिला सभा'** नावाची संस्था स्थापन केली. ही संस्था आजही शाळा, रुग्णालय आणि अनाथाश्रम चालवते. पुढे त्या **संविधान सभेच्या सदस्यही बनल्या** - म्हणजे त्यांनी आपल्या देशाचे संविधान बनवण्यात सहभाग घेतला. **बालविवाह, हुंडा आणि पर्दा पद्धत यां**विरोधात आवाज उठवणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या.

त्यांच्या कार्यासाठी भारत सरकारने **1975 मध्ये** त्यांना **'पद्मविभूषण'**या पुरस्काराने सन्मानित केले.

**शिकवण:** दुर्गाबाई आपल्याला शिकवतात की जर आपला निश्चय मजबूत असेल तर कोणतीही मुलगी - कितीही लहान असली तरी - मोठा बदल घडवून आणू शकते. शिक्षण, धाडस आणि मेहनतीच्या जोरावर ती देशाची दिशा बदलू शकते. दुर्गाबाईंची कथा प्रत्येक मुला-मुलींसाठी प्रेरणादायी आदर्श आहे.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### मल्लू अक्काची कथा: जंगलापासून तुरुंगापर्यंतचा संघर्ष

***ठिकाण:*** *वारंगल, आंध्र प्रदेश*



खूप वर्षांपूर्वीची गोष्ट होती. आंध्र प्रदेशातील एका छोट्या गावात एक मुलगी होती - तिचे नाव होते **मल्लू.** त्यांचे वडील शेतकरी होते, पण जमीनदारांच्या शोषणामुळे त्यांचे जगणे कठीण झाले होते. गरीब शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने भाडे कसे वसूल केले जाई आणि जो कोणी विरोध केला त्याला मारहाण केली जाई - हे मल्लूने लहानपणापासून पाहिले होते.

मल्लू लहान होती, पण तिचे मन खूप मोठे होते. फक्त **11 वर्षां**ची असताना तिने पहिल्यांदा ब्रिटीश सरकार आणि जमीनदारांच्या विरोधात घोषणाबाजी केली. ती 13 वर्षांची होईपर्यंत **तेलंगणा आंदोलना**मध्ये सामील झाली होती.

हळूहळू मल्लूअक्का **जननेता झाल्या, लोकांच्या हक्कांसाठी** लढत होती. **गुप्त बैठका** घेऊन लोकांना हक्काची **जाणीव करून देत असे** आणि जेव्हा गरज पडेल तेव्हा तिने **बंदूक उचलायलाही मागेपुढे पाहिले नाही**.

एके दिवशी, मल्लू आणि त्याच्या साथीदारांनी एका जमीनदाराच्या घरातून धान्य चोरले आणि ते गरिबांमध्ये वाटले. काही लोक म्हणाले - ‘ही चोरी आहे!’ पण मल्लूअक्काचे उत्तर सोपे आणि खरे होते. **"इंग्रज आणि जमीनदार आपल्याकडून सगळं लुटून नेतात. आपण त्यांच्याकडून परत घेऊन गरिबांमध्ये आणि भुकेल्यांमध्ये वाटतो. ही चोरी कशी होऊ शकते?"**

**मल्लू 15 वर्षांची** असताना तिला **अटक झाली.** इंग्रजांना वाटले की ही मुलगी आता काही करू शकत नाही. मात्र तुरुंगातही मल्लूने हार मानली नाही. तिथेही तिने कैद्यांना शिकवणे, समजावणे आणि प्रोत्साहन देणे सुरू केले.

पुढे मल्लू अक्का आंध्र प्रदेश विधानसभेची सदस्य झाली. तिने नेहमीच जनतेची सेवा केली आणि कधीही सत्तेचा गैरवापर केला नाही. **ती नेहमी म्हणायची, 'मी नेता नाही, मी जनतेचा मित्र आहे."**

**शिकवण:** तुम्ही तरुण असो वा वृद्ध, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे महत्त्वाचे आहे. धैर्य, सत्य आणि इतरांसाठी जगण्याची भावना हीच खरी ताकद आहे. बदल घडवून आणण्यासाठी तुम्हाला मोठ्या पदाची गरज नाही, तर मोठ्या मनाची आणि दृढ संकल्पाची गरज आहे.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### कर्तारसिंग सराभा - हसता हसता फाशी जाणारा धाडसी युवक

***ठिकाण:*** *लुधियाना, पंजाब*



कर्तारसिंग सराभा यांचा जन्म 1896 मध्ये झाला. ते लहानपणापासूनच खूप हुशार आणि जिद्दी होते. त्याची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे देशाबद्दलचे प्रेम. जेव्हा ते अवघ्या 15 वर्षांचे होते तेव्हा त्याच्या मनात स्वातंत्र्याची ठिणगी पेटली.

वयाच्या १८ व्या वर्षी ते अभ्यासासाठी अमेरिकेला गेले. तिथे त्यांनी पाहिले की, अनेक भारतीय स्थलांतरित देखील आपला देश स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करत आहेत. तिथे असताना **'गदर पार्टी' या** पक्षात त्यांनी प्रवेश केला. हा पक्ष परदेशी भूमीवर राहून भारतात क्रांती करण्याच्या प्रयत्न करत होता.

कर्तारसिंग यांनी बेधडकपणे ब्रिटिश राजवटीविरुद्ध काम सुरू केले. त्यांनी गुप्तपणे लोकांना स्वातंत्र्यासाठी तयार केले, देशभक्तीपर लेख आणि कविता लिहिल्या आणि गुप्तपणे पत्रिका छापल्या.

1914 मध्ये ते भारतात परतले आणि त्यांनी बंडाची योजना आखली. पण लवकरच ही बातमी इंग्रजांना मिळाली. कर्तारसिंगना अटक झाली. इंग्रजांच्या विरोधात काम केल्याबद्दल त्यांना न्यायालयात माफी मागायला सांगितल्यावर त्यांनी गर्जना केली - **"मी माफी का मागू? आम्हाला गुलाम बनवल्याबद्दल तुम्ही सर्वांनी आमची माफी मागितली पाहिजे. देशाला स्वतंत्र करणं हा गुन्हा नाही. जर माझ्याकडे 100 जन्म असते तर मी ते सर्व देशासाठी बलिदान दिले असते!"**

वयाच्या अवघ्या 19 व्या वर्षी त्यांना फाशी देण्यात आली. करतार सिंग यांनी अगदी लहान वयातच आपल्या प्राणाची आहुती दिली. भारत स्वतंत्र होताना ते पाहू शकले नाहीत, पण त्यांचे बलिदान व्यर्थ गेले नाही. त्यांच्या हौतात्म्याने हजारो तरुणांना स्वातंत्र्याच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली - त्यापैकी एक होते **शहीद-ए-आझम भगतसिंग,** ज्यांनी त्यांना आपले गुरू मानले.

**शिकवण:** कर्तारसिंगची सराबा यांची कथा आपल्याला शिकवते की, वय कधीही महत्त्वाचे नसते - तुमचा हेतू, तुमचे धैर्य आणि देशावरील तुमचे प्रेम महत्त्वाचे असते. या हुतात्म्यांचे आपण सर्व ऋणी आहोत; ज्यांनी कोणत्याही स्वार्थाशिवाय न घाबरता आणि आनंदाने देशासाठी बलिदान दिले.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### वीरबाला कनकलताची कथा

***ठिकाण:*** *बारंगबाड़ी, असम*




अनेक वर्षांपूर्वी आसाममधील एका लहानशा गावात एक धाडसी मुलगी जन्माला आली – तिचे नाव होते कनकलता बरुआ. ती फक्त 17 वर्षांची होती, पण देशाबद्दलचे प्रेम आणि धैर्य तिच्या मनात ओसंडून वाहत होते. लहानपणीच आई-वडिलांचे निधन झाले, पण आजीने प्रेमाने तिचे संगोपन केले. अभ्यासात हुशार असलेल्या कनकलताच्या मनात सतत एक प्रश्न घोळत असे – ***"माझा देश स्वतंत्र का नाही?"***

1942 मध्ये गांधीजींनी 'भारत छोडो' आंदोलन सुरू केले तेव्हा आसाममध्ये इंग्रजांच्या पोलीस ठाण्यावर तिरंगा फडकवण्याचा निर्णय झाला. कनकलताने ठरवले – ***"आता मी घरी बसणार नाही, मला स्वातंत्र्यासाठी लढायचे आहे."***

त्या दिवशी ती साथीदारांसह 80 मैल चालत गोहपूर पोलीस स्टेशनकडे निघाली. हातात तिरंगा, ओठांवर घोषणा – *"करेंगे या मरेंगे!"*. पोलिसांनी इशारा दिला – ***"पुढे आलात तर गोळ्या घालू!"*** पण ती ठामपणे म्हणाली – *"शरीर नश्वर आहे, पण आत्मा अमर आहे.* ***आम्ही योग्य गोष्टीसाठी लढत आहोत."*** ती पुढे सरसावली आणि गोळी तिच्या छातीत लागली.

पण आश्चर्य म्हणजे – कनकलता पडली तरी तिरंगा झुकला नाही. दुसरा तरुण मुकुंद झेंडा घेऊन पुढे गेला, **तोही शहीद झाला.** तरीही बाकीचे मित्र पुढे गेले आणि शेवटी त्या पोलीस स्टेशनवर तिरंगा फडकवण्यात आला.


**शिकवण:** कनकलता शिकवते की, देशभक्तीला वयाची नव्हे, तर साहसाची गरज असते. कनकलता स्वतः स्वातंत्र्य पाहू शकली नाही, पण तिच्या धैर्याने हजारो तरुणांना प्रेरित केले. आपले स्वातंत्र्य हे अशा वीरांचे देणे आहे, ज्यांनी देशासाठी प्राण अर्पण केले.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### शिरीष कुमार मेहता – तिरंग्यासाठी प्राणाची आहुती देणारा निडर मुलगा

***ठिकाण:*** *नंदुरबार, महाराष्ट्र*





ही कथा एका किशोरवयीन मुलाची आहे जो **केवळ 15 वर्षांचा होता** परंतु त्याच्या **हृदयात धैर्य आणि देशभक्तीचा ज्वालामुखी धगधगत होता.** त्याचे नाव होते **शिरीष कुमार.**

वर्ष होते **1942.** भारत छोडो आंदोलन देशभर पसरले होते. अनेक ठिकाणी लोक ब्रिटिश कार्यालये, पोलीस स्टेशन आणि सरकारी इमारतींमधून युनियन जॅक काढून तिरंगा फडकवत होते. महाराष्ट्रातील नंदुरबारमध्येही लहान मुले आणि तरुणांची मोठी मिरवणूक काढण्यात आली. त्या मिरवणुकीचे नेतृत्व केले होते **शिरीष कुमारने**.

हातात तिरंगा घेऊन मिरवणूक ब्रिटीश कार्यालयाजवळ येताच पोलिसांनी मार्ग अडवला. त्यांनी इशारा दिला - "मागे जा नाहीतर तुम्हाला गोळ्या घातल्या जातील!" पण **शिरीष घाबरला नाही.** तो ओरडला - "**आम्ही स्वातंत्र्य घेऊ!**"आणि मग **तिरंगा हातात धरून छाती उंच धरून तो पुढे सरकला.**

**धाँय!** गोळी झाडली... शिरीष कुमार तिथेच खाली पडला – पण तिरंगा हातातून खाली पडला नाही. **वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी** महान लोक ज्याची कल्पनाही करू शकत नाहीत ते त्यांनी केले. त्यांच्या बलिदानाने संपूर्ण परिसर हादरला. लोकांनी त्याला खांद्यावर उचलले आणि म्हणाले -**"शिरीष कुमार, जिंदाबाद!"**

त्यांच्या स्मरणार्थ नंदुरबारमध्ये **बाल शहीद शिरीष कुमार स्मारक**देखील बांधले आहे.

**शिकवण:** शिरीष कुमारची कथा आपल्याला हेच शिकवते की **देशभक्तीसाठी वयाची नव्हे तर धैर्याची गरज असते.** जेव्हा कोणी निर्भयपणे जे योग्य आहे त्यासाठी उभा राहतो, तेव्हा तो इतिहास घडवतो. आपल्या सर्वांना जे स्वातंत्र्य मिळाले आहे ते **अशा शूर मुलांच्या त्यागाने** मिळाले आहे. या तिरंग्याचे महत्व आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे.


# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### स्वातंत्र्यसैनिक नारायण दाभाडे - एका तरुणाचे बलिदान

***ठिकाण:*** *पुणे, महाराष्ट्र*

तुम्ही कधी विचार केला आहे - शाळेत जाताना तुम्ही इंग्रजांविरुद्ध घोषणा दिल्यास काय होईल?



आज आपण मोकळेपणाने बोलू शकतो – पण 1942 मध्ये घोषणाबाजी करणे म्हणजे तुरुंग किंवा मृत्यू असेच होते! आणि त्या काळातले असेच एक कॉलेजचे विद्यार्थी होते - नारायण दाभाडे. ना कोणी मोठा नेता, ना मंत्री - फक्त एक भारतीय तरुण, ज्याच्या नसानसांत देशभक्ती वाहत होती.

ही कथा ‘भारत छोडो’ आंदोलनादरम्यानची आहे. जेव्हा गांधीजींनी देशवासीयांना सांगितले -**"आता बास! इंग्रजांनी भारत सोडलाच पाहिजे!"**

त्या दिवशी संपूर्ण देशात वीज संचारली. वृद्ध, तरुण, लहान विद्यार्थीही रस्त्यावर उतरले. नारायण दाभाडे पुण्याच्या गरवारे कॉलेजमध्ये शिकलेला असा एक धाडसी विद्यार्थी होता. त्या दिवशी सारी हिंमत एकवटून तो रस्त्यावरून निघाला - **“इंग्रजांनो भारत सोडा!”** अशी घोषणाबाजी करत.

टिळक रोडवरील रस्ते घोषणांच्या आवाजाने दुमदुमत होते. तो आणि त्याचे साथीदार निर्भयपणे मिरवणूक काढत होते. मग इंग्रजांनी मार्ग अडवला. इंग्रज म्हणाला, “बाजूला व्हा!”. मात्र नारायण दाभाडे मागे हटला नाहीत. तो म्हणाले -**"आम्ही आमच्या देशासाठी स्वातंत्र्य मागत आहोत - आणि तो आमचा हक्क आहे!"**

आणि मग... धमाका! गोळी झाडली! सरळ नारायणच्या छातीत. तो अडखळला... पण पडण्याआधी – त्याने पुन्हा एकदा नारा दिला: **"भारत माता की जय!"**

तो तरुण अवघा १९ वर्षांचा होता – पण त्याचे धाडस इतके होते की इंग्रजही थक्क झाले.

**शिकवण:** धैर्य वय पाहत नाही. जे योग्य आहे त्यासाठी ठाम राहतो, तो मृत्यूनंतरही अमर होतो. आज आपल्याला सहज वाटणारे हे स्वातंत्र्य अशा असंख्य बलिदानांतून मिळाले आहे.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### भगत सिंह झुग्गियान

***ठिकाण:*** *होशियारपुर, पंजाब*






ही आणखी एका भगतसिंहांची अत्यंत प्रेरणादायी गोष्ट आहे, ज्यांनी फारच लहान वयात आपल्या अद्भुत धैर्य आणि देशभक्तीने इंग्रजांना चकीत केले. **भगतसिंह झुग्गियान** यांचा जन्म पंजाबच्या होशियारपूर जिल्ह्यात झाला. ते इयत्ता **चौथीत** शिकत होते, पण जोश आणि धैर्यात ते कुठल्याही मोठ्या योद्ध्यापेक्षा कमी नव्हते. एकदा शाळेच्या सभेत एका इंग्रज अधिकाऱ्याने त्यांना "इंग्रज सरकार जिंदाबाद" अशी घोषणा देण्यास सांगितले. फक्त अकरा वर्षांचे असलेले भगतसिंह झुग्गियान जोरात ओरडले — **"इंग्रज सरकार मर्दाबाद, हिंदुस्तान जिंदाबाद!"**
ब्रिटिश अधिकाऱ्याने त्यांना मारहाण केली आणि या भागातील कोणत्याही शाळेत त्यांना घेतले जाऊ नये अशी व्यवस्था केली.

पण भगतसिंहांनी **हार मानली नाही.** ते स्वातंत्र्य संग्रामात गुप्त संदेशवाहक आणि प्रेस चालक बनले. अंधाऱ्या रात्री ते **'उदारा प्रेस'** नावाच्या मशीनचे जड भाग पोत्यात भरून गुप्त क्रांतिकारकांच्या तळांवर पोहोचवत. आणि काही दिवसांनी खत, धान्य आणि रसद घेऊन परत येत — **त्यांच्या साहसामुळे पोलीसही त्यांना घाबरू लागले!**

त्यांनी फक्त स्वातंत्र्य संग्रामातच योगदान दिले नाही, तर स्वातंत्र्यानंतरही शेतकरी आणि मजुरांसाठी ते काम करत राहिले. १९४५ मध्ये त्यांनी **आजादी कमिटी** स्थापन केली. तिथे लोकांना शांतता, देशभक्ती आणि सहकार्य यासाठी जागरूक केले जात होते. ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर कठोर कारवाई केली, तरीही ते घाबरून मागे हटले नाहीत.

**शिकवण:** वय कधीही महत्त्वाचे नसते; जर जिद्द आणि धैर्य भरपूर असेल, तर लहान मुलगाही मोठे काम करू शकतो. खरे स्वातंत्र्य म्हणजे फक्त बंड नव्हे, तर सेवा, एकता आणि देशभक्ती होय. अशा लोकांना आपण ***स्वातंत्र्याचे सैनिक*** म्हणतो. यांची नावे कदाचित फारशी प्रसिद्ध नसतात, पण प्रेरणा देण्यात मात्र ते सर्वांत मोठे असतात.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### दिल्लीचा शूर सेनापती - बख्त खान

***ठिकाण:*** *दिल्ली*



वर्ष होतं 1857. संपूर्ण भारतात इंग्रजांविरुद्ध बंडाची ठिणगी पेटली होती. मेरठ, कानपूर, झाशी, लखनौ... सर्वत्र सैनिकांनी उठाव केला होता. त्याच वेळी, बरेलीहून एक उंच, देखणा आणि बुद्धिमान अधिकारी आपल्या शेकडो सैनिकांसह दिल्लीच्या दिशेने निघाला. त्याचं नाव होतं **बख्तखान**.

बख्तखान हा काही साधा सैनिक नव्हता. तो ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात **सुभेदार मेजर** या अत्यंत उच्च पदावर होता. पण इंग्रजांचा जुलूम, शोषण आणि देशाची लूट पाहून त्याच्या मनात बंडाचा ज्वालामुखी पेटला.

दिल्लीला पोहोचताच त्याने मुघल बादशाह बहादूर शाह जफर यांची भेट घेतली आणि ठाम शब्दांत म्हणाला – ***"महाराज, मला आपल्या सैन्याची कमान द्या. मी इंग्रजांना दिल्लीबाहेर हाकलून देईन."***

बख्तखानने सैन्य संघटित केले, तोफखान्याची जबाबदारी घेतली आणि इंग्रजांच्या जोरदार हादरा दिला. तो धाडसी, शिस्तप्रिय आणि दूरदृष्टी असलेला सेनापती होता. पण दुर्दैवाने, दरबारातील काही लोकांनी त्याच्या सूचनांकडे दुर्लक्ष केले – आणि हीच मोठी चूक ठरली.

शेवटी इंग्रजांनी दिल्ली पुन्हा काबीज केली. बख्तखान शौर्याने लढला, मागे हटला, पण कधीही पराभव मान्य केला नाही. पुढील काही वर्षे तो इंग्रजांविरुद्ध लढत राहिला. शेवटी रणांगणात शहीद झाला. त्याच्या मृत्यूने इंग्रजांनी सुटकेचा नि:श्वास टाकला – कारण बख्तखानसारखा शूरवीर त्यांच्यासाठी सर्वात मोठे आव्हान होता.

आज त्याची समाधी कुठे आहे, हे कुणालाही ठाऊक नाही. पण 1857 च्या स्वातंत्र्य संग्रामातील एक पराक्रमी योद्धा म्हणून त्याचं नाव इतिहासात अमर आहे. अनेक सैनिक आणि सामान्य लोकांना त्याच्याकडून इंग्रजांविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळाली.

**शिकवण:** देशभक्ती केवळ भाषणांनी सिद्ध होत नाही, ती कृतीतून आणि त्यागातूनच सिद्ध होत असते. बख्तखानने स्वातंत्र्याचे स्वप्न पाहिले आणि शेवटच्या श्वासापर्यंत त्यासाठी लढा दिला. आज आपण स्वतंत्र भारतात जगत आहोत, तर त्यात बख्तखानसारख्या अनेक अज्ञात वीरांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या बलिदानाची आठवण ठेवून आपणही प्रामाणिकपणे, धैर्याने आणि सेवेच्या भावनेने देशासाठी काम केलं पाहिजे.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### बाबू गेनू - २२ वर्षांचा निर्भय क्रांतिकारक

***ठिकाण:*** *पुणे, महाराष्ट्र*

आज मी तुम्हाला एका तरुणाची गोष्ट सांगणार आहे. वय फक्त २२ वर्षं... पण धैर्य इतकं प्रचंड की ब्रिटिश राजवटच हादरून गेली!




त्याचं नाव होतं बाबू गेनू. १९०८ साली, पुण्यातील एका गरीब दलित कुटुंबात बाबू गेनू यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती कठीण होती. लहानपणापासूनच ते कापड गिरणीत मजूर म्हणून काम करू लागले. शिक्षण पूर्ण होऊ शकलं नाही, पण त्यांच्या मनात देशप्रेमाची ज्योत कायम पेटत होती.

महात्मा गांधींच्या स्वदेशी चळवळीचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. परकीय वस्तूंचा तिरस्कार त्यांच्या मनात घट्ट बसला. १९३० मध्ये भारतभर विदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकला जात होता. लोक खादी वापरत होते, विदेशी कपडे जाळले जात होते.

एके दिवशी, पुण्याच्या रस्त्यावरून एक ट्रक जात होता. त्यात इंग्लंडहून आणलेले कपडे होते, आणि सोबत इंग्रज अधिकारी त्याचं रक्षण करत होते. तेवढ्यात बाबू गेनू तिथे आले. त्यांनी ट्रक अडवला आणि ठामपणे म्हणाले – **“हे विदेशी, देशद्रोही कापड आमच्या मातीत विकले जाणार नाही! घ्यायचे असेल तर आधी मला ठेचून काढावं लागेल!”**

इंग्रज अधिकाऱ्याला संताप आला. त्याने ट्रक चालकाला पुढे जायला सांगितले. पण चालकाने नकार दिला. रागाने इंग्रज स्वतः ट्रकवर बसला आणि ओरडला – **"या भारतीयाला गाडीखाली चिरडून टाकतो!"**

आणि मग त्याने ट्रक बाबू गेनूवर चालवला. ते जागीच शहीद झाले!

ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. हजारो लोक रस्त्यावर उतरले, विदेशी कपड्यांची होळी केली. एका साध्या मजुराने केलेल्या बलिदानाने संपूर्ण पुणे पेटून उठले.

**शिकवण:** बाबू गेनू आपल्याला शिकवतात की देशभक्तीला ना संपत्तीची गरज असते, ना उच्च पदाची – ती हृदयातून जन्म घेते. जर एका मजुराने आपल्या प्राणांची आहुती देऊन इंग्रजांना रोखलं, तर आपणही देशासाठी काहीतरी नक्कीच करू शकतो.

आज, जेव्हा तुम्ही खादी किंवा कुठलीही स्वदेशी वस्तू वापरता, तेव्हा लक्षात ठेवा – तुम्ही बाबू गेनूचं अपूर्ण स्वप्न पुढे नेत आहात.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### अशफाकउल्ला खान

***ठिकाण:** शहाजहानपूर, उत्तर प्रदेश*




भारत ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता, तो खूप पूर्वीचा काळ. 1900 साली उत्तर प्रदेशातील शाहजहानपूर या शहरात एका धाडसी मुलाचा जन्म झाला — त्याचे नाव होते **अशफाकउल्ला खान**. ते पठाण मुस्लिम कुटुंबातील होते, पण त्यांच्या हृदयात धर्मापेक्षा देशाविषयीचे प्रेम अधिक खोलवर रुजलेले होते.

लहानपणापासूनच त्यांना स्वातंत्र्याच्या स्वप्नाचे आकर्षण होते. इंग्रजांच्या अन्यायाने ते अस्वस्थ होत आणि भारत स्वतंत्र व्हावा, हीच त्यांची मनापासूनची इच्छा होती. हळूहळू ते **शहीद-ए-आझम भगतसिंग** आणि **रामप्रसाद बिस्मिल** यांसारख्या क्रांतिकारकांच्या संपर्कात आले आणि *हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन* (HRA) या क्रांतिकारी संघटनेत सामील झाले.

1925 साली त्यांनी आणि त्यांच्या साथीदारांनी एक धाडसी योजना आखली — ब्रिटिशांच्या खजिन्याची लूट करून क्रांतीसाठी पैसा उभा करण्याची. हीच योजना इतिहासात **काकोरी घटना** म्हणून प्रसिद्ध झाली. 9 ऑगस्ट रोजी त्यांनी एक ट्रेन थांबवून ब्रिटिशांचा खजिना लुटला. या पराक्रमाने इंग्रज हादरले आणि क्रांतिकारकांच्या शोधाला लागले.

काही महिन्यांनी अशफाकउल्ला खान आपल्या एका ओळखीच्या माणसाच्या विश्वासघातामुळे पकडले गेले. तुरुंगात त्यांच्यावर अमानुष छळ झाला, पण इंग्रजांनी कितीही विचारले तरी त्यांनी इतर क्रांतिकारकांचे नाव उघड केले नाही. त्यांना फैजाबाद तुरुंगात डांबण्यात आले.

19 डिसेंबर 1927 रोजी त्यांना फाशी देण्यात आली. फाशीपूर्वी ते निर्धाराने म्हणाले — ***मी मुस्लिम आहे, माझा पुनर्जन्मावर विश्वास नाही, पण तरीही मला पुन्हा पुन्हा भारतात जन्म घ्यायचा आहे, आणि प्रत्येक वेळी देशासाठी बलिदान द्यायचे आहे."***

**शिकवण:** अशफाकउल्ला खान यांनी दाखवून दिले की खरा देशभक्त धर्म, जात किंवा पंथ याच्या पलीकडे जातो — तो फक्त मातृभूमीसाठी जगतो आणि तिच्यासाठी प्राणार्पण करतो.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### भाई कोतवाल - माथेरानचा क्रांतिवीर

***ठिकाण:*** *माथेरान, महाराष्ट्र*



डोंगरांच्या कुशीत वसलेल्या माथेरान गावात एक धाडसी तरुण जन्मला — **भाई कोतवाल**. त्याचे हृदय मात्र केवळ माथेरानसाठी नाही, तर संपूर्ण भारतासाठी धडधडत होते.

भाई कोतवाल हुशार विद्यार्थी, वकील आणि सामाजिक कार्यकर्ते होते. शेतकरी आणि गरीब कुटुंबांच्या मदतीसाठी त्यांनी शाळा सुरू केल्या, तसेच गरजूंना स्वस्त दरात अन्न मिळावे म्हणून "धान्याची दुकाने"ही उघडली. त्यांनी लोकांना जात-धर्माच्या भिंती विसरून एकमेकांचे मित्र होण्याची प्रेरणा दिली.

त्या काळी इंग्रजांचे अत्याचार दिवसेंदिवस वाढत होते. तरुणांच्या मनात रोष उसळत होता. भाई कोतवाल यांनी ठरवले — *आता पुरे! आता आम्ही आवाज उठवू!* ते **भारत छोडो आंदोलनात** सामील झाले आणि ठाणे जिल्ह्यात भूमिगत राहून इंग्रजांविरुद्ध काम करू लागले.

त्यांचे सर्वात मोठे योगदान होते — गुप्त माहिती पोहोचवणे, इंग्रजी टेलिफोन लाईन्स तोडणे, ब्रिटिशांच्या गाड्या विस्कळीत करणे... ज्यामुळे स्वातंत्र्य चळवळीला नवी ऊर्जा मिळाली. इंग्रज त्यांचा पिच्छा करत होते, पण भाई कोतवाल कधी जंगलात, कधी डोंगरात, तर कधी गावात लपून आपले काम करत राहिले.

पण एके दिवशी, विश्वासघाताने इंग्रजांनी त्यांना पकडले. त्यांना ठाणे तुरुंगात टाकण्यात आले. इंग्रजांना वाटले, की मृत्यूच्या भीतीने भाई कोतवाल सर्व रहस्य उघड करतील. पण त्यांनी एक शब्दही न बोलता सगळं आपल्या छातीशी घट्ट जपलं. वैतागून, इंग्रजांनी त्यांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली.

**22 ऑगस्ट 1943** रोजी शिक्षा सुनावली गेली आणि **10 मे 1945** रोजी भाई कोतवाल यांनी फाशीच्या फासाला हसत-हसत चुंबन दिलं... पण तिरंग्याला कधीच झुकू दिलं नाही.

**शिकवण:** भाई कोतवाल यांनी शिकवले की स्वातंत्र्याचा लढा केवळ तलवारीनेच नाही, तर धैर्य, शहाणपण आणि निष्ठेनेही जिंकला जातो. ते एक खरे '*अज्ञान' हिरो* आहेत — ज्यांच्या बलिदानामुळे आज आपण मुक्त श्वास घेऊ शकतो.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### सरहद्द गांधी — खान अब्दुल गफ्फार खान

***ठिकाण:*** *उत्तर-पश्चिम सरहद्द प्रांत, पाकिस्तान*



खूप वर्षांपूर्वी, आजच्या पाकिस्तानमध्ये, एक असा पठाण योद्धा जन्माला आला जो तलवारीने नाही, तर शांतता आणि प्रेमाने लढू इच्छित होता. त्यांचे नाव होते — **खान अब्दुल गफ्फार खान**. लोक त्यांना प्रेमाने **सरहदी गांधी** म्हणत.

पठाण समाजाबद्दल लोकांचा समज होता की ते रागीट आणि भांडखोर असतात. पण खान साहेबांनी आपल्या लोकांना सांगितले — ***"खरी हिम्मत तलवार उचलण्यात नाही, तर राग शांत ठेवण्यात आहे."***

आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी अहिंसा आणि सेवेच्या मार्गाला अर्पण केले. त्यांनी **'खुदाई खिदमतगार'** नावाचा संघ तयार केला — म्हणजेच *ईश्वराचे सेवक*. हे कार्यकर्ते हातात शस्त्र घेत नसत, फक्त लाल कुर्ता घालून सेवा, सत्य आणि बंधुत्वाचा संदेश पसरवत असत. या संघात हजारो पठाण सहभागी झाले — आणि विशेष म्हणजे यात लहान मुलेही होती!

ही मुले अजिबात घाबरत नसत. ते गावोगाव फिरून इंग्रज अधिकाऱ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवत, लोकांना जागरूक करत, आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून इंग्रजांना हैराण करत — तेही कुठलीही हिंसा न करता! ही मुले जेलमध्ये जाण्याला किंवा पोलिसांच्या माराला घाबरत नसत. एकदा तर एका इंग्रज अधिकाऱ्याने म्हटले, ***"या मुलांइतके धाडसी आम्ही कुणालाच पाहिले नाही!"***

इंग्रज थक्क झाले — इतके शूर लोक, पण हातात शस्त्र नाही! खान साहेब मात्र ठाम होते — ***"आम्हाला बदला नको, आम्हाला बदल हवा आहे."***

त्यांच्या या विचारसरणीने पठाणांची प्रतिमा बदलली. जगाला दाखवून दिले की खरी शौर्याची कसोटी म्हणजे दुसऱ्याला माफ करणं आणि देशासाठी शांततेच्या मार्गाने लढणं.

**शिकवण:** खान अब्दुल गफ्फार खान आपल्याला शिकवतात — ***हृदय मोठं असेल, तर हिंसेची कधीच गरज भासत नाही.***

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### अल्लाह बख्श सुमरू

***ठिकाण:*** *सिंध*



तो काळ खूप कठीण होता. भारतावर इंग्रजांचे राज्य होते. प्रत्येक कोपरा स्वातंत्र्यासाठी तळमळत होता. कुठे निदर्शने होत होती, कुठे घोषणाबाजी होत होती. पण या लढ्यात आणखी एक धोक्याची छाया पसरत होती — काही लोक धर्माच्या नावावर भारताचे तुकडे करण्याची भाषा बोलत होते.

अशा वेळी, एक निडर नेता पुढे आला — **अल्लाह बख्श सुमरू**. 1890 मध्ये सिंध प्रांतातील एका साध्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ना ते राजघराण्यातले, ना मोठे जमीनदार. पण त्यांच्या हृदयात देशासाठी जाज्वल्य प्रेम आणि न्यायासाठी लढण्याचे अपार धैर्य होते. लहान वयातच त्यांनी राजकारणात पाऊल टाकले. प्रामाणिकपणा आणि कष्ट यांच्या जोरावर ते सिंध प्रांताचे पंतप्रधान झाले. पण सत्ता त्यांच्या डोक्यात गेली नाही. ते नेहमी लोकांमध्ये मिसळून त्यांचे दुःख ऐकत आणि म्हणत, ***"मी नेता नाही, मी जनसेवक आहे!"***

जेव्हा देशाला स्वातंत्र्याची सर्वात जास्त गरज होती, तेव्हा काही लोकांनी हिंदू–मुस्लिमांमध्ये भिंती उभ्या करण्याचा प्रयत्न केला. पण अल्लाह बख्श शांत बसले नाहीत. त्यांनी **'आझाद पार्टी'** स्थापन करून स्पष्ट सांगितले — ***"भारत एक आहे, त्याचे विभाजन कोणी करू शकत नाही! हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन — सर्व या मातीची लेकरं आहेत."***

ब्रिटिश राजवटीला विरोध म्हणून त्यांनी इंग्रजांनी दिलेल्या सर्व पदव्या आणि पुरस्कारांचा त्याग केला. ते **१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात** सामील झाले. गांधीजींसारखाच त्यांचा अहिंसा आणि एकात्मतेवर दृढ विश्वास होता. त्यांचे स्वप्न होते — स्वतंत्र आणि अखंड भारत.

भारताच्या फाळणीच्या विरोधात त्यांनी मुस्लिमांच्या अनेक मोर्चांचे नेतृत्व केले. त्यांच्या चळवळीत लाखो हिंदू–मुस्लिम एकत्र आले. ही गोष्ट भारताचे विभाजन करू इच्छिणाऱ्यांना खटकली.

**14 मे 1943** रोजी, एका कार्यक्रमासाठी जात असताना दोन सशस्त्र व्यक्तींनी त्यांच्यावर गोळीबार केला… आणि देशाने आपला एक खरा पुत्र गमावला.

**शिकवण:** अल्लाह बख्श सुमरू यांनी दाखवून दिले की खरी देशभक्ती ही धर्म, जात, भाषेच्या पलीकडे असते. हृदयात धैर्य आणि हेतू शुद्ध असेल तर कोणतीही शक्ती आपल्याला तोडू शकत नाही. त्यांची कहाणी आजही सांगते — ***"भिऊ नका, खरे बोला! आपसात भांडू नका, एकत्र चला!"***

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### जादूगार शोभारामची गोष्ट

***ठिकाण:*** *अजमेर, राजस्थान*



अजमेरच्या एका छोट्याशा गावात एक साधा, सरळ मुलगा राहत होता — **शोभाराम गेहरवार**. तो दलित समाजातून आला होता. दिसायला साधा, पण त्याच्या हृदयात स्वातंत्र्याची प्रचंड ज्वाला पेटलेली होती.

अवघ्या १४-१५ व्या वर्षीच तो स्वातंत्र्यलढ्यात उतरला. त्याच्याकडे ना शस्त्रं होती, ना मोठं शिक्षण. पण त्याच्याकडे एक वेगळीच ताकद होती — **कुठल्याही रूपात मिसळून जाण्याची कला**! कधी शेतकरी, कधी मजूर, तर कधी संत — असा वेश बदलून तो इंग्रज पोलिसांच्या नजरेआड होत असे.

एकदा तर थेट **चंद्रशेखर आझाद** यांनी त्याला जंगलातील बॉम्ब बनवण्याच्या ठिकाणी नेले. पोलिस जवळपास असतानाही शोभाराम हळूच हातातून निसटून जाई — जणू एखादा जादूगार! म्हणूनच लोक त्याला म्हणत — **"अजमेरचा जादूगार!"**

त्याच्या आयुष्यात एक मजेशीर पण धोकादायक प्रसंग घडला. त्याच्या साथीदारांनी नदीकिनारी गनपावडरचा स्फोट केला आणि योगायोगाने तेवढ्यात एक वाघ पाणी प्यायला आला. स्फोटाच्या आवाजाने वाघ पळून गेला... पण पोलिसांच्या तुकडीत मात्र एकच गोंधळ उडाला! या गडबडीत शोभाराम आणि त्याचे साथीदार सुखरूप पळून गेले.

शोभाराम **मानवी पोस्टमन** म्हणूनही काम करत असे. ब्रिटिश सरकार पत्रांची तपासणी करत असल्याने भूमिगत क्रांतिकारकांशी संपर्क साधणे कठीण झाले होते. पण तो धाडसाने संदेश पोहोचवत असे — कित्येकदा आपला जीव धोक्यात घालून. एकदा तर पोलिसांनी त्याच्या पायात गोळी झाडली, तरीही तो पळून जाण्यात यशस्वी झाला!

स्वातंत्र्यानंतर शोभाराम यांनी कधीच कोणतेही पद, पुरस्कार किंवा प्रसिद्धीची मागणी केली नाही. तो नेहमी म्हणायचा — ***"मी नावासाठी नाही, देशासाठी काम केलं आहे."***

शोभारामसारख्या धैर्यवान, चतुर आणि निःस्वार्थ देशभक्तांमुळेच आपण आज स्वतंत्र आहोत. त्यांना सत्तेची लालसा नव्हती — फक्त देशासाठी जगण्याची ओढ होती.

**शिकवण:** तुम्ही तरुण असाल वा वृद्ध — अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे महत्त्वाचे आहे. खरी ताकद ही मोठ्या खुर्चीत नसते, ती मोठ्या मनात, धैर्यात आणि ठाम संकल्पात असते.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### हौसा पाटील: जंगलाची शूर बहीण

***ठिकाण:*** *सातारा, महाराष्ट्र*



तुम्ही कधी कल्पना केली आहे का, की कोणी बंदुकीशिवाय, सैन्याशिवाय आणि न घाबरता इंग्रजांशी लढू शकते?

हौसा पाटील ही अशीच एक शूर स्त्री होती — जी दिवसा शेत नांगरायची आणि रात्री जंगलात स्वातंत्र्यासाठी लढायची! महाराष्ट्रातील एका छोट्याशा गावातून निघून तिने ब्रिटिश राजवटीला खुले आव्हान दिले — आणि तेही न थांबता, न घाबरता.

त्या काळात इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी ***'प्रति सरकार'*** नावाचे गुप्त स्वराज्य उभे करण्यात आले होते — म्हणजे जनतेचे स्वतःचे सरकार! हौसा दीदी या सरकारसाठी सर्वकाही करत असत — रात्रीच्या अंधारात संदेश पोहोचवणे, जखमी सहकाऱ्यांना औषधं देणे, इंग्रजांपासून लपवून अन्नधान्य व कपडे आणणे... ती म्हणायची, ***"गावच्या मातीने आम्हाला खायला दिलं, आता त्या मातीसाठी काहीतरी परत देण्याची वेळ आली आहे!"***

हौसा दीदींची खरी ताकद म्हणजे तिची हिंमत आणि चातुर्य. एकदा इंग्रज सैनिकांनी गावात येऊन तिला पकडण्याचा प्रयत्न केला, पण गावातील महिलांनी तिला विविध ठिकाणी लपवून ठेवले — कधी भातशेतीत, कधी विहिरीजवळ, तर कधी जंगलाच्या पायवाटांवर.

तिचा सर्वात थरारक अनुभव कृष्णा नदी पार करण्याचा होता. ती काळोखी रात्र होती, पाणी ओसंडून वाहत होतं, पूल कुठेच नव्हता. पण हौसा दीदी घाबरल्या नाहीत. त्या आणि त्यांच्या साथीदारांनी मोठ्या धैर्याने, कधी लाकडी फळीवर तर कधी बैलगाडीच्या तुटलेल्या चाकावर बसून नदी पार केली. पाण्याचा प्रवाह जोरदार होता, पाणी बर्फासारखं थंड होतं — पण त्यांच्या मनातील ज्वाला अधिक तापलेल्या होत्या!

स्वातंत्र्याच्या इतिहासात आपण अनेक मोठी नावे ऐकतो, पण हौसा पाटीलसारख्या साध्या, तरीही असामान्य स्त्रिया आपल्याला विसरून चालणार नाहीत. ती अनेकदा म्हणायची — ***"आम्ही काहीही मोठं केलं नाही, आम्ही फक्त गरजेचं काम केलं."***

**शिकवण:** हौसा पाटील ही राणी नव्हती, तिच्याकडे ना तलवार होती ना सैन्य. पण तरीही ती खरी योद्धा होती. लहानशी कामेसुद्धा मनापासून केली तर देशाला मुक्त करण्यात ती मोठी भूमिका बजावू शकतात, हे तिने दाखवून दिलं. आज आपण शाळेत जाऊ शकतो, आपले विचार मोकळेपणाने मांडू शकतो — कारण हौसा दीदी आणि त्यांच्या सारख्या हजारो नायकांनी ते स्वातंत्र्य आपल्यासाठी जिंकून दिलं. आपणही त्यांच्या सारखे निर्भीड, निडर आणि खरे देशभक्त व्हायला हवं.

# कथा

## भारताच्या महान स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायकांच्या

### सर्वात शांत पण सर्वात मोठा आवाज - उषा मेहता

***ठिकाण:*** *सुरत, गुजरात*




वर्ष होतं **१९२०.** ठिकाण — गुजरातमधील सुरत शहर. तिथे एका छोट्याशा गोंडस मुलीचा जन्म झाला. तिचं नाव होतं **उषा मेहता.** इतर मुलं अंगणात खेळण्यात रमायची, पण उषाच्या हृदयात देशभक्तीची एक प्रखर ज्योत पेटलेली होती.

एकदा, ती फक्त **८ वर्षांची** असताना, तिने गांधीजींच्या *सविनय कायदेभंग चळवळीत* भाग घेतला. उषाने जोरदार घोषणा दिल्या — ***"ब्रिटिश भारत सोडा!"***

१९४२ मध्ये गांधीजींनी *भारत छोडो आंदोलन* सुरू केलं. ब्रिटिश सरकार घाबरलं आणि गांधीजी, नेहरूजींसह सर्व मोठे नेते तुरुंगात टाकले गेले. आता एक मोठा प्रश्न उभा राहिला — **गांधीजींचा संदेश आणि खरी बातमी लोकांपर्यंत पोहोचणार कशी?**

याच वेळी उषा दीदींनी एक धाडसी योजना आखली. तिने काही जिवलग साथीदारांसोबत मिळून सुरू केलं गुप्त रेडिओ स्टेशन — **"काँग्रेस रेडिओ."** एका गुप्त खोलीतून हा रेडिओ सुरू व्हायचा, आणि दररोज उषा दीदी लोकांपर्यंत पोहोचवायच्या — चळवळीच्या खरी बातम्या, गांधीजी व नेत्यांची भाषणं, आणि पुढे काय करायचं याचा संदेश.

ब्रिटिश पोलिसांना याचा वास लागला. चौकशी सुरू झाली. अनेकदा उषा दीदी आणि तिचे साथीदार रेडिओ घेऊन इकडे-तिकडे पळाले, लपले, तरी हार मानली नाही. अखेर **१२ ऑगस्ट १९४२** रोजी इंग्रजांनी त्यांना पकडलं. तिची कठोर चौकशी झाली, धमक्या दिल्या गेल्या — पण उषा दीदी खडकासारख्या खंबीर उभ्या राहिल्या. तिने आपल्या कोणत्याही साथीदाराचं नाव सांगितलं नाही.

तिला तुरुंगवास झाला, पण तिच्या मनात एकच स्वप्न होतं — ***"माझा भारत स्वतंत्र व्हावा!"***

स्वातंत्र्यानंतर उषा मेहतांनी शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि समाजसेवा यासाठी आयुष्य झोकून दिलं. भारत सरकारने त्यांना **'पद्मविभूषण'**सह अनेक पुरस्कारांनी गौरवलं.

**शिकवण:** देशाची सेवा करण्यासाठी वयाचं बंधन नसतं, फक्त धैर्याची गरज असते. एक मुलगीसुद्धा आपला आवाज उठवून इतिहास घडवू शकते. सत्य आणि धैर्य यापेक्षा मोठी ताकद दुसरी नाही.